FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154156

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लाप्रवि, पहिली खबर क्र. २९, वर्ष २०२०, दिनांक २९/१२/२०२०
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रति. अधि. १९८८, कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार ........, तारीख पासून दि. १२/०३/२०२० वेळ ........ ते तारीख पर्यंत दि. १३/०३/२०२० वेळ ........
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 ~~(7)~~ 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख दि. १३/०३/२०२० वेळ ........
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. २६/२०२०. तारीख २९/१२/२०२० वेळ १८.०० वा.
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा पश्चिमेस ५० मीटर, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव गोकुळ हॉटेल ठिकाणाचे नंबर जवळ, गल्ली बांद्रा पोलीस ठाणे जवळ
Address of Occurrence Name हिल रोड, No. if any बांद्रा (प), Ward मुंबई ५० Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव श्री. दिलीप शांका
Name
(b) वडिलांचे / पतीचे नाव श्री. बाबुलाल शांका
Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ६२ वर्षे
Date of Birth and Age
(d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ........
Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........, दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय ज्वेलर्स
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता रुम नं. ६, गल्ली / सर्व्हे नं. ........ पहिला माळा, घर / नाव नं. बेला बिल्डिंग, फोन / मो. नं. ........ पॅन नं. ........ मस्जिद हील रोड, वोटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव बांद्रा (प), जवळचे प्रसिद्ध ठिकाण मुंबई - ४०००५०, गाव ........, पोस्ट ........, पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........, जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता वरील प्रमाणे
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

श्री. अभय शेलार, सहाय्यक पोलीस निरीक्षक, बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

POCO
SHOT ON POCO F1
Scanned with CamScanner

यातील फिर्यादी श्री. दिलीप बाबुलाल रांका, वय 62 वर्षे, धंदा - ज्वेलर्स, राहि - रूम नं. 07, पहीला माळा, बेला व्हिस्टा बिल्डिंग, एस. व्ही. रोड, वांद्रा (प). मुंबई - 50 यांचा स्वतंत्र कागदावर संगणकीकृत केलेला जबाब हाच सदर गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात आला आहे.

समक्ष

(अरूण घोडके)
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई.

Dilip R
29.12.2020
Dilip. B. Ranka

Scanned with CamScanner

जबाब दिनांक २९/१२/२०२०

श्री दिलीप बाबुलाल रांका, वय ६२ वर्षे, धंदा – ज्वेलर्स, राठि – रूम नं. ०७, पहिला माळा, बेला विस्टा बिल्डिंग, एस.व्ही. रोड, बांद्रा (प), मुंबई ४०००५०. मो.नं. ९९३०५०६०९०.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर सन १९७१ पासून राहावयास आहे. मला एक मुलगी असून ती विवाहित असल्याने तिचे पतीचे घरी खार, मुंबई येथे राहावयास आहे. मला साधारणपणे सन २००३ पासून मधुमेह, ब्लड प्रेशर तसेच मागील तीन वर्षापासून लिव्हरचा त्रास असल्याने त्यावर उपचार चालु आहेत. मी सध्या माझ्या वर नमुद पत्त्यावर एकटाच राहावयास आहे.

माझे घरी २४ तास घरकाम करण्यासाठी एक कोमल नावाची महिला असून ती माझ्याच घरात ऑगस्ट २०२० पर्यंत राहावयास होती. कोमल हिने मला न विचारता माझे आडनाव लावून पॅन कार्ड, आधार कार्ड व पासपोर्ट बनविला होता. सदरबाबत मला माहित होताच मी त्याबाबत कोमल हिला विचारणा केली असता, तिने मला माझी प्रॉपर्टी तिच्या नावावर करा नाहीतर मला जेलमध्ये बंद करेल अशी धमकी दिली. सदर गोष्टीमुळे माझे ब्लड प्रेशर व मधुमेह वाढण्यास सुरूवात झाली.

दिनांक १२/०३/२०२० रोजी सकाळी बांद्रा पोलीस ठाणेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. अभय शेलार यांनी मला फोन करून पोलीस ठाणेस बोलाविले. त्यावर मी पोलीस ठाणेस जावून सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. अभय शेलार यांना भेटलो असता त्यांनी मला सांगितले की, कोमल नावाच्या महिलेने तुमच्या विरूध्द तक्रार केली असून त्यात तुम्हाला अटक करणार नाही त्यासाठी तुम्ही मला रूपये ३०,०००/– दया असे सांगितले. परंतु मला लोकसेवक यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी दिनांक १३/०३/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी मुंबई येथे लोकसेवक सहायक पोलीस निरीक्षक श्री. अभय शेलार यांचेविरूध्द पोलीस निरीक्षक प्रदिप देवकर यांचेकडे लेखी तक्रार दिली. त्यावेळी सदर ठिकाणी सपोआ. कुडाळकर हे देखिल हजर होते. मी लेखी तक्रार अर्ज दिल्यानंतर दोन शासकीय पंचाना समक्ष पडताळणी करण्याकरीता बोलाविण्यात आले. त्यावेळी पंचाना देवकर साहेब यांनी तक्रारीची थोडक्यात हकिगत सांगितली व माझा तक्रारी अर्ज वाचण्याकरीता दिला. त्यावर पंचानी अर्ज वाचून सहया केल्या. त्याच दिवशी पंचासमक्ष आमचे वक्तव्य घेतले. त्यांनतर शासकीय वाहनाने लोकसेवकाच्या कार्यालयाजवळ बांद्रा स्टेशनच्या बाजुला गेलो तेथे पोनि देवकर यांनी मला व पंचाना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर माझ्या शर्टाच्या आतिल बाजूस बनियानला व्हॉईस रेकॉर्डर लावून मी व पंच श्री. आण्णाजी पवार असे आम्ही लोकसेवक यांना भेटण्याकरीता बांद्रा पोलीस ठाणे येथे गेलो. सदर ठिकाणी गेल्यानंतर मी लोकसेवक सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. अभय शेलार यांना त्यांच्या मोबाईलवर फोन केला असता, ते मला बांद्रा पोलीस ठाणेच्या बाजूला असलेल्या गोकुळ हॉटेल येथे कॉफी पिण्याकरीता घेवून गेले. कॉफी पिताना लोकसेवक व माझेत इतर विषयांवर चर्चा झाली. त्यावेळी मी लोकसेवक सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. अभय शेलार यांनी माझेकडे केलेल्या लाचेच्या मागणीच्या अनुषंगाने त्यांना म्हणालो की, "नही तो आपको खाली थोडा फिगर कम करवानेके हिसाब से आया हुं..... नही तो वहा से लाके देना है.... तो मेरा अभी गोल्ड का रेट भी कम हो गया ... आज तो बहुत टूट गया भाव..." त्यानंतर परत आमच्यात इतर चर्चा झाली व नंतर लोकसेवक मला म्हणाले "चलो कल देखते है..." त्यावर मी त्यांना म्हणालो " बोलोना कितना.... अरे एकबार फिगर दे दोना अभी लाके देता हु ना आपको... मै भी थोडा हलका हो जाऊ तो..." त्यावर लोकसेवक म्हणाले "कल...." त्यावर मी " चलो ठिक है... कितने बजे आऊ फिर कल" असे विचारले असता, त्यांनी "यही टाईम पे..." असे सांगितले. त्यानंतर मी व लोकसेवक हॉटेलच्या बाहेर आलो व रिक्षात पंच श्री पवार यांचेसह बसत असताना परत लोकसेवक सहाय्यक पोलीस

Scanned with CamScanner

निरीक्षक श्री. अभय शेलार यांना म्हणालो "नही तो मेरे को थोडा फिगर बोल देते तो अच्छा रहता" त्यावर लोकसेवक यांनी "फिक्स था वो..." असे सांगितले मी म्हणालो "क्या... कितना..." त्यावर लोकसेवक सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. अभय शेलार म्हणाले "तीस..." मी सांगितले "क्या बीस करो ना..." ते म्हणाले "तीस बराबर था.." परत मी त्यांना "बीस बोलोना साहब..." असे म्हणलो असता, त्यांनी "ठिक... पच्चीस मै कर दो... अभी कर रहा है क्या" असे म्हणून माझेकडे २५,०००/– रूपये लाचेची मागणी केली.

सदरची लाचेची रक्कम घेवून दिनांक १६/०३/२०२० रोजी लोकसेवक अभय शेलार यांना भेटण्याचे ठरले. त्यानुसार दिनांक १६/०३/२०२० रोजी परत मला पोनि देवकर यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात बोलाविले. त्यावेळी कार्यालयात सपोआ श्री कुडाळकर व दोन शासकीय पंच श्री अण्णाजी पवार व श्री किरण चव्हाण हे देखिल हजर होते. त्यानंतर वरील पडताळणी कारवाई प्रमाणे पोनि देवकर यांनी मला व पंचाना करावायाच्या कारवाईबाबत सुचना देवून माझे शर्टाच्या आतिल बाजूस बनियानला व्हॉईस रेकॉर्डर लावला व अँथ्रासिन पावडर लावलेल्या २००० रू. दराच्या ३ व ५०० रू. दराच्या ३८ चलनी नोटा असे एकूण रू. २५,०००/– किंमतीच्या चलनी नोटा माझ्या पॅन्टच्या पुढील बाजूच्या उजव्या खिशात ठेवण्यात आल्या व लोकसेवक मागणी करतील त्यावेळी त्या त्यांना देण्याबाबत योग्य त्या सुचना मला दिल्या. त्यानंतर मी, पंच व पोलीस पथक असे ठरल्याप्रमाणे निघालो. मी पंच श्री अण्णाजी पवार यांचेसोबत बांद्रा पोलीस ठाणे येथे गेलो व लोकसेवक सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. अभय शेलार यांच्याबाबत विचारणा केली असता, ते सुट्टीवर असल्याचे मला समजले. त्यानंतर श्री. अभय शेलार यांनी माझेसोबत कोणत्याही प्रकारचा संपर्क साधलेला नाही.

त्यानंतर लोकसेवक सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. अभय शेलार यांनी माझ्याशी संपर्क साधाला नाही तसेच त्यानंतर कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव सर्वत्र पसरल्याने मुंबईत लॉक डाऊन घोषीत करण्यात आले तसेच मला मधुमेह व ब्लड प्रेशरचा त्रास असल्याने मी त्याबाबत पाठपुरावा केला नाही. त्यानंतर मी गावी गेलो होतो.त्यामुळे आज रोजी तक्रार देत आहे.

तरी माझेकडे घरकाम करणारी महिला नामे कोमल हिने बांद्रा पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीच्या अनुषगाने बांद्रा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. अभय शेलार यांनी मला अटक न करण्याकरींता दिनांक १३/०३/२०२० रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान स्वतःच्या फायदयाकरीता कायदेशीर परिश्रमाखेरीज २५,०००/– रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी करून गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणून माझी त्यांच्याविरूध्द फिर्याद आहे.

माझा वर नमुद जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो मला मराठीतून वाचून, हिंदीतून समाजावून सांगितला असून तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

(signature)

( अरूण घोडके )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Dilip Ranka (signature)
29.12.2020
Dilip. B. Ranka.

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ... पडताळणी करुन दाखल.

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकुण मूल्य ... —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ... —

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळ व ठिकाणी यातील आरोपी लोकसेवक श्री. अभय शेलार, सहाय्यक पोलीस निरीक्षक, बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई यांनी फिर्यादी यांचे -विरुद्ध महीला नामे कोमल हीने केलेल्या तक्रारीवरुन फिर्यादीस अटक न करण्याकरीता स्वतःसाठी रु. 25,000/- रक्कमेच्या लाचेची मागणी करुन गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रति. अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक, अरुण घोडके, लाप्रवि, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

... —

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ... — ..., जिल्हा ... — ..., राज्य ... —

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ... — ... Rank ... — ... No. — ...
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ... — ... (3) Transferred to P. S. ... — ...
District ... — ... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ... अरुण घोडके ...
पदनाम Rank ... पोलीस निरीक्षक, ...
तपासिक अं. चा कोड क्र. ... लाप्रवि, मुंबई
Posting
Code No. of I. O. ...

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ...
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्वतः प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner